मूव्ही कॅमेऱ्याचा जनक प्रिन्स ऑगस्टीन



ऑगस्टीन काही राजपुत्र नव्हता. तरीही त्याला प्रिन्स हे बिरुद लागलं होतं. हा तरुण राजघराण्यातला असावा असं सगळ्यांना वाटत असे. त्याचं व्यक्तिमत्त्वच तसं राजबिंड होतं.

१८४२ मध्ये फ्रान्समध्ये त्याचा जन्म झाला. त्याचे वडील लष्करात होते. आपल्या मुलानेही महान सेनानी व्हावं अशी वडिलांची इच्छा होती. त्यादृष्टीने त्यांनी आपल्या मुलाला प्रशिक्षणही दिलं होतं. सहा फूट आणि सहा इंच उंच असं त्याचं भारदस्त व्यक्तिमत्त्व सगळ्यांना प्रभावित करणारं होतं. प्रिन्सच्या डोळ्यांतली चमक समोरच्या माणसावर भुरळ पाडणारी असायची. त्याचे डोळे सतत काहीतरी शोधत असायचे.

लष्करी प्रशिक्षण घेऊनही प्रिन्सला त्यात रुची अजिबात नव्हती. वडिलांच्या ओळखीने त्याला सैन्यात नोकरी मिळाली. पण तिथे रोज रोज कराव्या लागणाऱ्या कवायतींना तो कंटाळला होता. एक दिवस सरळ आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि तो लष्करातून बाहेर पडला. राजीनाम्यात त्याने लिहिलं होतं, 'कोणावर तलवार चालवायची हा माझा स्वभाव नाही. माझं मन फुलासारखं कोमल आहे. त्यामुळे एखाद्या क्षणी मी माझं कर्तव्य करताना कचरण्याची शक्यता आहे. म्हणून आताच मी सैन्यातून बाहेर पडत आहे.'

त्याचा राजीनामा स्वीकारण्यात आला. प्रिन्स ऑगस्टीनचे वडील त्याच्या या कृतीने रागावले. त्यांच्या मते तो सत्ता गाजवायलाच जन्माला आला होता.

प्रिन्सला त्यांचं हे म्हणणं पटणारं नव्हतं. तो म्हणाला, 'तलवारीच्या जोरावर कोणावर सत्ता गाजवणं मला मान्य नाही. संहारक कधीही अमर बनत नाही. मला संहारक नाही तर सर्जक बनायचं आहे. सर्जकाचं नाव आदराने घेतलं जातं. इतिहास त्याच्या कार्याची दखल पुढे अनंत काळ घेतो.'

पिता-पुत्रात चांगलीच खडाजंगी झाली. त्यावेळी पॅरीसमध्ये लुई दागोरीचं चांगलं नाव झालं होतं. या माणसाने सर्वप्रथम फोटोग्राफी सिस्टमचा शोध लावला होता. स्टीलकॅमेरा शोधला होता. प्रिन्स ऑगस्टीनचा त्याच्याशी परिचय झाला. प्रिन्सला त्याच्या अद्भूत जगात रस वाटू लागला होता. त्याने फोटोग्राफीची कला आत्मसात करून व्यावसायिक स्टुडियो सुरू केला.

त्याच वेळी जॉन व्हाइटली नावाचा एक इंग्रज तरुण त्याच्या स्टुडियोत फोटो काढण्यासाठी आला होता. प्रिन्सने त्याचा चांगला फोटो काढला इतकंच नाही तर तो रंगवूनही दिला. जॉन व्हाइटली स्वतःचं ते देखणं रूप पाहून इतका खूश झाला की त्याने प्रिन्सला ब्रिटनला येण्याचं आमंत्रण दिलं. आपल्या संपूर्ण कुटुंबाचा फोटो काढण्यासाठी. त्यासाठी जाण्या-येण्याचा खर्च देण्याचंही त्याने मान्य केलं.

प्रिन्सने त्याचं निमंत्रण स्वीकारलं आणि एक दिवस नक्की येण्याचं आश्वासनही दिलं.

नंतर ऑगस्टीनच्या वडिलांनी त्याच्यासाठी एका धनाढ्य परिवारातली मुलगी शोधली. ऑगस्टीनला ती मुलगी अजिबात पसंत नव्हती. त्याला श्रीमंत मुलीशी लग्न करणंच मान्य नव्हतं. ऑगस्टीन वडिलांना म्हणाला, 'एखाद्या सधन पित्याच्या मुलीशी लग्न करून तिच्या गुलामीत राहणं मला आवडणार नाही. ज्याप्रमाणे कोणावर सत्ता गाजवणं मला आवडत नाही त्याप्रमाणेच माझ्यावर कोणी सत्ता गाजवलेलीही मला चालणार नाही.'

पुन्हा एकदा वडील आणि मुलगा यांच्यात वाद झाला. लष्करी शिस्तीतल्या कठोर स्वभावाच्या वडिलांनीही मग फर्मान काढलं, 'माझ्या आज्ञेचं पालन न करणाऱ्या मुलाची मलाही गरज नाही.'

दुसऱ्याच दिवशी आपला कॅमेरा उचलून ऑगस्टीन ब्रिटनला निघाला. तो तडक जॉन व्हाइटलीच्या घरी पोहोचला. जॉनच्या वडिलांचं इंजिनीयरिंगचं वर्कशॉप होतं. स्वभावाने ते अतिशय प्रेमळ होते.

ऑगस्टीनने त्यांच्या कुटुंबियांचे फोटो काढले. जॉनच्या बहिणीला ऑगस्टीनविषयी आकर्षण वाटू लागलं होतं. ती स्वतः एक चांगली कलाकार होती इतकंच नाही तर वडिलांच्या व्यवसायातही मदत करत असे. ऑगस्टीनने तिचे फोटो काढले. ते घेऊन तो तिच्याकडे पोहोचला तेव्हा तिने विचारलं, 'मिस्टर ऑगस्टीन!'

ऑगस्टीन म्हणाला, 'मिस्टर ऑगस्टीन नाही. लोक मला प्रिन्स ऑगस्टीन म्हणून ओळखतात.'

'ओह, तुम्ही प्रिन्स आहात तर?'


'होय.'

'तुमचे वडील कुठले राजा आहेत?'

'नाही, ते सैन्यात आहेत.'

'मग तुम्ही स्वतःला प्रिन्स कसे म्हणवता?'

'कारण मी राजपुत्रासारखा दिसतो आणि तसाच जगू इच्छितो.'



प्रिन्स ऑगस्टीनने शोधलेल्या कॅमेऱ्याची आतली आणि बाहेरची रचना

'मग एखाद्या राजकुमारीबरोबर लग्न करणार असाल?'

'माझ्याप्रमाणे स्वतःला राजकुमारी मानणाऱ्या मुलीशी लग्न करायला मला आवडेल.'

'अशी एखादी मुलगी पाहण्यात आहे की काय?'

'होय, आहे.'

'कोण आहे ती? कुठे राहते?'

'ही काय माझ्या समोर तर आहे. मी तिच्याशीच तर बोलतोय.'

हे ऐकल्यावर ती लाजली आणि म्हणाली, 'तुम्ही तर कमालीचे फोटोग्राफर आहात.'

यावर प्रिन्स उत्तरला, 'तुम्हीही एक चांगल्या फोटोग्राफर आहात.'

'मी? ती कशी काय?'

'कारण स्त्रीचे डोळे कॅमेऱ्यापेक्षाही अधिक शक्तिशाली असतात. तुम्ही तुमच्या नजरेच्या कॅमेऱ्याने मला टिपलंत आणि तुमच्या हृदयात बंदिस्त केलंत.'

कालांतराने त्या दोघांचा विवाह झाला. दोघंही एकमेकांसाठी अनुरूप होते. प्रिन्स ऑगस्टीनने सासऱ्यांच्या कारखान्यात ड्राफ्ट्समन आणि डिझायनर म्हणून काम सुरू केलं. फोटोग्राफीत काहीतरी नवीन करण्याची त्याची इच्छा होती.

सासरच्या कारखान्यात बनणारी नवी यंत्र विकण्यासाठी त्याला अमेरिकेला जावं लागलं. पती-पत्नी दोघंही १८८० मध्ये न्यू यॉर्कला पोहोचले. तिथे त्यांनी फोटोग्राफीतलं नवं संशोधन पाहिलं. एडवर्ड मायब्रीज नावाच्या एका इंग्रजाने चलतचित्रं बनवली होती. कॅलिफोर्नियाच्या रेसकोर्सवर धावणाऱ्या घोड्यांची ती फिल्म होती. त्यासाठी दोन डझन कॅमेऱ्यांचा वापर करण्यात आला होता. काचेच्या प्लेटवर फोटो छापून ती तयार करण्यात आली होती. मॅजिक लॅन्टर्नवर त्या जोडून दाखवण्यात आल्या तेव्हा घोडे खरोखरच धावतायत असं वाटत होतं.

प्रिन्सला हा शोध खूप आवडला. त्याने मुव्ही कॅमेरा शोधायचा निश्चय केला. त्यादृष्टीने कामालाही सुरुवात केली. ३२ लेन्स असलेला एक कॅमेरा बनवला. प्रोजेक्टरही बनवला. पण त्याचा हवा तो रिझल्ट आला नाही. दुसरा कॅमेरा बनवला. त्यात १६ लेन्स वापरल्या. पण एक महत्त्वाचा प्रश्न भेडसावत होता तो पॉझेटिव्ह निगेटिव्हचा. काचेची प्लेट वापरतोय तोपर्यंत या समस्येवर तोडगा निघणं शक्य नाही हे ऑगस्टीनच्या लक्षात आलं. १८८७ मध्ये इस्टमेन कंपनीने फिल्मचा शोध लावला. ऑगस्टीनला आनंद झाला. त्याच्या शोधाला दिशा मिळाली होती. आता आपण नक्की मुव्ही कॅमेरा बनवू शकू असा विश्वास ऑगस्टीनला वाटू लागला होता. मुव्ही कॅमेऱ्याची कल्पना करणारा ऑगस्टीन हा पहिला माणूस. मुव्ही कॅमेऱ्याच्या शोधाशी फ्रान्सच्या ल्युमेरी ब्रदर्सचं नाव जोडलं जातं. पण ऑगस्टीनने त्यांच्याही आधी हा कॅमेरा बनवला होता.

अधिक चांगला मुव्ही कॅमेरा बनवण्याच्या हेतूने ऑगस्टीन ब्रिटनला परतला. सासऱ्याच्या फॅक्टरीत तो साधनं बनवू लागला. विजेवर चालणारा प्रोजेक्टर बनवला. आर्क लॅम्पचा वापर केला. त्यावेळी फार थोड्या गावांत विजेची सुविधा पोहोचली होती. प्रोजेक्टरला वीज मिळावी या हेतूने ऑगस्टीनने छोटं स्टीम इंजिनही बनवलं. जेणेकरून तो छोट्या छोट्या गावांतही आपल्या कॅमेऱ्याचा शोध पोहोचवू शकेल.

कॅमेऱ्यात आणखी सुधारणा करण्याच्या विचाराने ऑगस्टीनने पुन्हा फ्रान्सला जायचा निश्चय केला. तिथे त्याचा भाऊ होता. तो एक जाणकार इंजिनीयर होता. भावाचा सल्ला घेण्यासाठी ऑगस्टीन पती-पत्नी फ्रान्सला पोहोचले. दोन्ही भाऊ एकमेकांना प्रेमाने भेटले. ऑगस्टीनचं संशोधन पाहून भाऊ खूश झाला. तुझा हा शोध तुला प्रचंड द्रव्य मिळवून देईल आणि तुझं नावही अजरामर करेल या शब्दांत भावाने ऑगस्टीनचं कौतुक केलं.

१८९० च्या सप्टेंबरमध्ये प्रिन्स डिजॉनहून पॅरीसला परतायला निघाला. त्यांचा निरोप घ्यायला सगळे स्टेशनवर आले होते. पॅरीसच्या जनतेसमोर प्रिन्स आपला नवा शोध सादर करणार होता.

ट्रेन पॅरिसच्या स्टेशनवर पोहोचली. या महान संशोधकाचं स्वागत करायला स्टेशनवर लोकांनी गर्दी केली होती. पण प्रिन्स त्या गाडीतून आलाच नाही. त्याचं सामानही गहाळ झालं होतं. तो अचानक कुठे गायब झाला तेच कळेना. अपघात झाला असं म्हणावं तर तशी कोणतीही लक्षणं दिसत नव्हती.

१९१४ पर्यंत पोलीस प्रिन्सचा शोध घेत होते. २४ वर्षं हा तपास चालू होता. प्रिन्सच्या पत्नीच्या मते कोणी तरी व्यावसायिक वैमनस्यातून प्रिन्सचं अपहरण करून त्याच्या नोट्स आणि कॅमेरा पळवला असणार.

प्रिन्स अचानक गायब झाल्यानंतर बरोबर सहा वर्षांनी ल्युमेरी बदर्सनी मुव्ही कॅमेरा बनवला. तो शोध त्यांच्या खाती नोंदला गेला. प्रिन्सने इतकी वर्षं मेहनत करून केलेल्या संशोधनाचं श्रेय दुसऱ्याच कोणाला तरी मिळालं होतं. प्रिन्सचा शोध अंधारात राहिला.

पण ब्रिटनमध्ये त्याच्या सासरच्या गावी ज्या ठिकाणी प्रिन्सने आपला कॅमेरा पहिल्यांदा लोकांच्या समोर आणला होता तिथे आजही त्याचं स्मारक जपून ठेवण्यात आलं आहे. ✶